Sample Marking Scheme (2026-27)
Subject-Marathi
Subject Code-(009)
Class- X

Time: 3 hrs. Max. Marks: 80

| | | | |
|---|---|---|---|
| **विभाग - 'अ' - वाचन व आकलन - 15 गुण** | | | |
| **प्रश्न 1.** | **अ)** | **प्रश्न1) उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायांतून निवडा आणि लिहा. (कोणतेही 3)** | **5** |
| | I | C) झेंड्याच्या खांबाला टेकून | |
| | II | C) आई-वडिलांनी शिक्षणासाठी पाठवले. | |
| | III | B) आईपासून दूर राहायचं नव्हतं. | |
| | IV | C) आईचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी | |
| | V | B) मोठ्ठा साहेब | |
| | VI | A) नातं घट्ट आणि वेगळं न होणारं. | |
| | **ब)** | **खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | I | राजेश एकटाच बसला, कारण तो आईवर रागावलेला होता. | |
| | II | राजेशला शेवटी त्याची चूक जाणवली. | |
| | III | आई मला भाकर चुरून कोण खाऊ घालणार,मला झोपतांना कोण थोपटणार, माझी बाजू कोण घेणार, मला पोटाशी कोण धरणार",असे अनेक प्रश्न विचारले. | |
| | IV | शेवटी राजेश खेळणाऱ्या मुलांमध्ये सामील होतो. | |
| **प्रश्न 2.** | **अ)** | **प्र.2) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायांतून निवडा आणि लिहा. (कोणतेही 4)** | **4** |
| | I | C) अंधार | |
| | II | D) निराशा | |
| | III | B) सत्यदीप | |
| | IV | A) लोभाच्या वाटा | |
| | V | B) प्रकाशाच्या दारी | |
| | **ब)** | **कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | I | कवितेतील नायक सत्य, प्रामाणिकपणा, परिश्रम यात आनंद शोधतो. | |
| | II | जीवनात नीतीच्या वाटेने चालणारा खरेपणाने जिंकतो. | |
| | III | अंधार कितीही गडद असला, तरीही हातात सत्याचा दीप घेऊन हळूहळू चालत राहिले पाहिजे. | |
| | IV | जीवनात चुकीच्या गोष्टी ढळतात म्हणजेच नष्ट होतात. | |
| | V | रस्त्यातील लोभाच्या चमचमत्या वाटांना 'सुखाचे खरे दाता' म्हटले आहे. | |
| | | **विभाग – ब – व्याकरण – 20 गुण** | |
| **प्रश्न 3.** | **अ)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 4)** | **4** |
| | I | C) शब्दयोगी अव्यय | |
| | II | C) क्रियाविशेषण अव्यय | |
| | III | C) पण | |
| | IV | D) अरेरे! | |
| | V | C) अद्वितीय | |
| | **ब)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | I | मुलगा पुस्तक वाचेल. | |
| | II | वर्तमानकाळ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | III | काल मी पावसात खेळले / खेळलो. | |
| | IV | C) रस्ता एकेरीच होता. | |
| | **क)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | I | आम्ही तुमचे उपकार कधीही विसरणार नाही. | |
| | II | विश्वाचा पसारा मर्यादित नाही. | |
| | III | केवलप्रयोगी वाक्य / उद्गारार्थी वाक्य. | |
| | IV | आवडती वस्तू हरवल्यास कोणाला दुःख होत नाही ? | |
| | **ड)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | **2** |
| | I | पडवळ | |
| | II | वाहन सावकाश चालले होते. | |
| | III | मिरच्या | |
| **प्रश्न 4.** | **अ)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | **2** |
| | I | C) डोंगर | |
| | II | B) रस्ता - रस्ते | |
| | III | D) वीट | |
| | **ब)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | **2** |
| | I | B) अपाय - उपाय | |
| | II | B) शशी | |
| | III | A) कामगार | |
| | **क)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | **2** |
| | I | A) देव - दानव | |
| | II | D) अनास्था | |
| | III | D) विरक्ती | |
| | **ड)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही 2)** | **2** |
| | I | D) द्विगू समास | |
| | II | C) नवरात्र | |
| | III | B) मातापिता | |
| | | **विभाग –'क' – पाठ्यपुस्तक आधारित – ( गुण-30)** | |

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रश्न 5.** | **अ)** | **एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही 3)** | **3** |
| | I | कादंबरी अनपेक्षित वळणं घेत घेत वाचकांची उत्कंठा वाढवते. | |
| | II | डॉ.माशेलकरांच्या आईला त्यांच्या शिक्षणासाठी परिचयातील एका माऊलीकडून मदत मिळाली. | |
| | III | पावडेकाकांची पावले गोजिरी व गुलाबी होती. | |
| | IV | सन्मान करण्याच्या रुपाने आपण एक शालीन जग गमावून बसण्याचा धोका अधिक संभवतो. | |
| | V | आयुष्याचं मोल देऊन तनमनधनानं फुलवलेली कर्मभूमी सोडताना दाजीसाहेबांना काय वाटले असेल, या विचाराने अब्दुल हळवा झाला. | |
| | **ब)** | **खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.(कोणतेही 3)** | **3** |

| | | | |
|---|---|---|---|
| | I | नुसता **वायू** भक्षण करून राहिलास तरी तू असाच जाड्या राहाणार. | |
| | II | तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा **काळा** रंग ठरतो. | |
| | III | आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन **खूश** होता. | |
| | IV | मूळ कथा दर्जेदार असल्याशिवाय कोणतीही **कलाकृती** उत्तम होऊ शकत नाही. | |
| | V | शालीमुळे शालीनता येत असेल तर मी **कर्जबाजारी** होईन. | |
| | **क)** | **खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही 1 )** | **3** |
| | I | उत्तर – प्रस्तावना- शाल या पाठात लेखक रा.ग.जाधव यांनी शालेभोवती असलेल्या त्यांच्या आठवणी सांगितल्या आहेत.<br>'शाल' ही प्रतीकात्मक आहे. तर शालीनता ही 'चरित्रात्मक' आहे. आपल्या मनात असलेली, एखाद्या व्यक्तिबद्दलची आदराची भावना. आपण त्या व्यक्तीबद्दलचा सन्मान शाल हे प्रतीक देऊन प्रकट करतो. त्यातून त्या व्यक्तिमध्ये असलेला गुण दिसून येतो. तो म्हणजे शालीनता (नम्रता). व्यक्तीचे चारित्र्य हे शालीनतेमध्ये दडलेले असते, त्याच व्यक्तीचे चरित्र लिहिले जाते, ज्या व्यक्तीचे चारित्र्य चांगले आहे. चारित्र्याचे एक अंग आहे 'शालीनता'! आणि म्हणून मला वाटते की, 'शाल' ही प्रतीकात्मक आहे; तर शालीनता ही चरित्रात्मक आहे. | |
| | II | उत्तर – प्रस्तावना- फूटप्रिंट्स या पाठात प्रदीप आवटे यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद केलेले आहे<br>पर्यावरण प्रदूषणात वाढ होईल, अशीच आपली जीवनशैली नसावी. सार्वजनिक वाहनांचा वापर न करणे, एकाच माणसासाठी खाजगी वाहनाचा वापर, थोड्या-थोड्या अंतरासाठी बाईक-मोटारगाड्यांचा वापर यातून सदैव कार्बनचे उत्सर्जन आपण करत असतो. त्यामुळे जागतिक तापमान वाढीस मदत होते. शक्यतो आपण सार्वजनिक वाहनांचा उपयोग केला पाहिजे. थोड्या-थोड्या अंतरासाठी सायकलीचा किंवा पायी चालण्याचा पर्याय निवडला पाहिजे. म्हणजे कमीत-कमी पेट्रोलचा वापर केला पाहिजे. झाडे लावली पाहिजेत, हिरवळ वाढवली पाहिजेत, जेणे करून वातावरणातला कार्बन डायऑक्साईड कमी होऊन हवा शुद्ध राहण्यास मदत होईल. | |
| | III | उत्तर – प्रस्तावना- 'खरा नागरिक' या पाठात लेखक 'सुहास बारटक्के' यांनी शालेय विषय केवळ अभ्यासायचे नसून आचरणात आणायचे असतात, हे 'निरंजन'च्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट केले आहे.<br>निरंजन कष्टाळू व प्रामाणिक मुलगा होता. घरची, गोठ्यातली कामे करायचा. अभ्यासातही हुशार होता. नागरिकशास्त्राच्या पेपरच्या दिवशी सकाळपासून अभ्यास करून तो वाराने जेवायला म्हणून देशमुखांकडे जात होता; पण पुलावर त्याने अघटितच पाहिले. कुणीतरी पुलाचे काँक्रीट फोडून रेल्वेचे रूळ वेडेवाकडे करून ठेवले होते. घातपात करण्याचा कट त्याच्या लक्षात आला. तो सावध झाला. गाडी येण्यापूर्वीच त्याने स्टेशनकडे धाव घेतली. प्रसंग व धोका समजावून सांगितला. पंचनामा करण्यासाठी अधिकारी हजर झाले. संभाव्य धोका निरंजनामुळे टळला. केवळ पुस्तकी ज्ञान मिळवून गुण मिळवणे एवढेच मर्यादित ध्येय न ठेवता स्वार्थ बाजूस सारून त्याने सर्वांचा जीव वाचविला. खऱ्या नागरिकाचे कर्तव्य त्याने निभावले होते. म्हणूनच निरंजन हा खरा नागरिक. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **ड)** | **खालील वाक्यातील वाक्प्रचार ओळखा व त्याचा अर्थ कंसातील कोणत्या वाक्प्रचाराशी जुळतो ते लिहा**. | **5** |
| | I | वेळच मिळत नाही. - उसंत न मिळणे | |
| | II | स्वप्न पूर्ण केले. - स्वप्न साकार करणे | |
| | III | वेळेची जाणीव ठेवली पाहिजे. - भान ठेवणे | |
| | IV | दरिद्री झाला. - भिकेला लागणे | |
| | V | विनवीत होता. - आर्जव करणे | |
| | | | |
| **प्रश्न 6.** | **अ)** | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 4)** | **4** |
| | I | वणव्यात पाडस अडकेल, अशी भीती हरणीला वाटते. | |
| | II | हरघडी कविवर्य नारायण सुर्वे यांनी अश्रू वाळविले नाही. | |
| | III | सैनिकांचे पाऊल जिद्दीचे आहे. | |
| | IV | उद्योगाचे यंत्र श्रमशक्तीचे मंत्र म्हणत आहेत. | |
| | V | पक्षिणी लगेचच धरणीकडे पिल्लू धरणीवर पडायला लागल्यावर झेपावते. | |
| | VI | सैनिकांच्या विजयाची दौड डोळे भरून पाहावी. | |
| | **ब)** | **खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.(कोणतेही 4)** | **4** |
| | I | अशा **असंख्य** ज्योतींची तुझ्या मागून राखण. | |
| | II | **अंकिला** मी दास तुझा. | |
| | III | भाकरीचा चंद्र शोधण्यातच **जिंदगी** बरबाद झाली. | |
| | IV | हजार आम्ही **एकी** बळकट. | |
| | V | जीव ओवाळावा तरी जीव किती हा **लहान**. | |
| | **क)** | **खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. (कोणतेही1)** | **3** |
| | I | **संदर्भ** – 'स्वप्नं करु साकार' या कवितेत कवी किशोर पाठक यांनी भारत देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटले आहे.<br><br>**स्पष्टीकरण-** कवीने आपल्या भारत देशाच्या उज्ज्वल भविष्याचे सुंदर स्वप्न रेखाटतांना कृषिसंस्कृतीचे महत्त्व आपल्याला पटवून दिले आहे. ऊनपावसाचा खेळ चालू असणाऱ्या श्रावण महिन्यामध्ये धरती हिरव्या रानांनी, पाना–फुलांनी सजलेली असते. शेतकऱ्यांच्या मेहनतीने, कष्टाने इथली माती म्हणजेच इथली शेते धनधान्याने डोलू लागलेली असतात. धरतीचे हे सौंदर्य पाहून सगळे जण आनंदित होतात. चैतन्यमय, प्रसन्न वातावरण सर्वत्र निर्माण झालेले असते. ज्याप्रमाणे सुदर्शनचक्र फिरले की, दु:खाचा, अडचणींचा नाश होतो आणि सर्वत्र आनंद पसरतो, त्याचप्रमाणे शेतकरी जणू आपल्या कष्टाने चैतन्याचे, आनंदाचे सुदर्शनचक्र फिरवत असतो. त्याच्यासह मेहनत करून आपणही या शेतातून, मातीमधून मोती म्हणजेच धान्यरूपी अपार धन पिकवूया. आपल्या धरतीला सुलजाम् सुफलाम् बनवूया.<br><br>**वैशिष्ट्य -** कवितेतून कृषिसंस्कृतीचे सुंदर चित्रण कवीने केले आहे. | |
| | II | **संदर्भ** – 'औक्षण' या कवितेत कवयित्री 'इंदिरा संत' यांनी सीमेवर लढायला जाण्यासाठी सुसज्ज | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | झालेल्या जवानाला औक्षण करताना मनात येणाऱ्या विविध भावनांचे वर्णन केले आहे.<br>**स्पष्टीकरण-** देशाच्या रक्षणासाठी सीमेवर अहोरात्र आपले जवान शत्रूशी दोन हात करत असतात. आपल्या भारतमातेचे रक्षण करतात. त्यामुळेच आपण सर्व आनंदाने, सुखाने जगत असतो. सण, उत्सव साजरे करत असतो, आपणांस त्यांचा नेहमीच अभिमान वाटत असतो. त्याचप्रमाणे कवयित्री इंदिरा संत या सुद्धा जवानांवर खूप प्रेम करतात. जवानांप्रती त्यांच्या मनात जिव्हाळा, प्रेम, आदर आहे. घरातून सीमेवर लढण्यासाठी जायला निघालेल्या जवानाला त्या ओवाळत आहेत. त्याला ओवाळणी करत असताना कवयित्रीच्या मनात विविध भावना निर्माण होतात. त्या म्हणतात की, माझ्याकडे एवढी शक्ती, सामर्थ्य नाही त्यामुळे देशासाठी, या सैनिकांसाठी मी काय करावे हे मला कळत नाही.<br><br>**वैशिष्ट्य -** सामान्य माणसाची दुबळी इच्छाशक्ती या काव्यपंक्तीतून व्यक्त होते. | |
| **प्रश्न 7.** | | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 5)** | 5 |
| | I | ताकास तूर लागू न देणे' या वाक्प्रचाराचा अर्थ व्युत्पत्तीकोशात एखाद्या गोष्टीचा थांगपत्ता लागू न देणे, गोष्ट लपवून ठेवणे हा आला आहे. | |
| | II | लेखकाने विद्यार्थ्यांना बार्क / भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर या संस्थेतील आपले अनुभव सांगितले आहे. | |
| | III | 'दिवाळी' या शब्दांची व्युत्पत्ती संस्कृत शब्द - दीपावलि शब्दापासून झाली आहे. | |
| | IV | मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागचे वरिष्ठांनी सांगितलेले कारण म्हणजे काम सुरू करण्याआधीच लोक काय काय मागण्या करतात, हे आहे.. | |
| | V | 'शहाणा' या शब्दाला मूळ अर्थाशिवाय व्युत्पत्तीकोशानुसार अजून अतिशहाणा हा अर्थ प्राप्त झाला आहे. | |
| | VI | बॉसने सांगितले तेवढेच काम करायचे, आणि काम नसेल तर आपल्याला काही कामच नाही, असे समजायचे, माणसांतील ही प्रवृत्ती गेली पाहिजे, असे डॉ.भाभांनी सांगितले आहे. | |
| | VII | 'दार' हा प्रत्यय फारसी भाषेतील आहे. | |
| | | **विभाग - ड – लेखन कौशल्य – १५ गुण** | |
| **प्रश्न 8.** | **अ]** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 120 – 150 शब्दांत लेखन करा.** | 5 |
| | | **निबंध आवश्यक मुद्दे –**<br>आकर्षक सुरूवात व परिणामकारक शेवट,<br>विषयविस्तार, तर्कशक्ती, उपयोजन कौशल्य, मुद्देसूद लेखन,<br>योग्य विरामचिन्हांचा वापर, शुद्धलेखन,<br>काव्यपंक्ती, वाक्प्रचार, म्हणींचा सुयोग्य वापर.<br>**कथा आवश्यक मुद्दे –**<br>कथेला समर्पक शीर्षक,<br>आकर्षक प्रारंभ व समर्पक शेवट,<br>ओघवती भाषाशैली, उत्कंठावर्धक मांडणी,<br>मुद्देसूद मांडणी, कल्पकता, रंजकता, | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | संवाद व विरामचिन्हांचा यथायोग्य वापर<br>– दोन्ही लेखन प्रकारात यांचा सारासार विचार करून गुणदान. | |
| | **ब]** | **खालील विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (कोणतेही 1)** | **5** |
| | | **आवश्यक मुद्दे -**<br>**दिनांक** - पत्राच्या सुरूवातीला वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा.<br>**मायना** - ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे अभिवादनासह संबोधित करावे.<br>**विषय** - मोजक्या शब्दांत लिहावा.<br>**मजकूर -** मजकूर विषयाशी संबंधित त्रोटक व नेमका असावा. समर्पक, मुद्देसूद रचना असावी. भाषा व्यावहारिक व भारदस्त असावी.<br>**शेवट व समारोप** - पत्राचा शेवट करताना डावीकडील खालच्या कोपऱ्यात पत्र पाठविणाऱ्याचे नाव, पत्ता असावा.<br>पत्रलेखनात दोन्ही पत्ते, दिनांक, विषय या सर्व गोष्टी पत्राच्या डाव्या बाजूलाच असाव्यात.<br>**टीप** - लिफाफा आवश्यक (हे पत्रलेखन आहे. ई-मेल नाही. त्यामुळे पत्र लिहिल्यानंतर शेवटी ई-मेल लिहिला नसेल, तरी चालेल.)<br>**गुण विभागणी –**<br>दिनांक व मायना – १ ,<br>विषय – ०.५,<br>मजकूर – २,<br>शेवट व समारोप – ०.५<br>लिफाफा- १ | |
| | **क]** | **खालील दिलेल्या विषयावर जाहिरातलेखन करा. [कोणतेही १]** | **5** |
| | | **आवश्यक मुद्दे –**<br>• आकर्षक मजकूर<br>• साधी,सोपी आकर्षक, स्पष्ट, ओघवती भाषा<br>• ग्राहकांच्या मनात विश्वासार्हता<br>• वेचक,अर्थपूर्ण<br>• वाचकांशी संवाद साधणारी | |